Vol. 5 | Special Issue -2 | October 2019 Impact Factor: 4.197 ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue on the Occasion of
UGC Sponsored Interdisciplinary National Conference on

# Gandhian Thought:
## Past, Present and Future

1 October, 2019

Organized by
Shri. Yogeshwari Education Society's

## Swami Ramanand Teerth Mahavidylaya
Ambajogai, Dist. Beed - 431517



*Chief Organizer*
**Mr. Ramesh Sonwalkar**
*I/C Principal, S.R.T.M. Ambajogai*

*Chief Editor*
**Dr. Shailaja Barure**
*Director, Gandhian Studies Center,*

*Associate Editor*
**Mr. Dhanaji Arya**
*Director, IQAC*

## अनुक्रमणिका

१. सत्याग्रही करतुरबा गांधी | डॉ.शैलजा भा. बरूरे | १३
२. गांधी विषयी इतके गैरसमज यामुळे / प्रा.डॉ.विठ्ठल दहिफळे | १९
३. महात्मा गांधीच्या अहिंसा तत्वांची प्रासंगिकता : एक ऐतिहासिक अवलोकन / डॉ. बी.जी.कुलकर्णी | २४
४. महात्मा गांधींच्या सर्वोदय विचारांची प्रासंगिकता / सविता सो. बुरांड | २९
५. महात्मा गांधी और खिलाफत तहरिक / डॉ. शेख अब्दुल रउफ | ३५
६. गांधी विचारांची समर्पकता /व्दारकाप्रसाद वि.वायाळ | ३८
७. वर्तमान भारतमें गांधी विचार कि प्रासंगिकता / Dr.Hasmukh Panchal | ४६
८. गांधीवादाचा मराठी साहित्यावर पडलेला प्रभाव / डॉ. मधुकर श्रीरंग पवार | ४७
९. महात्मा गांधीजींचे सामाजिक विचार / प्रा.महेंद्र पी. देशपांडे | ५०
१०. महात्मा गांधी आणि राष्ट्रवाद / प्रा. एम. के. मगरे | ५६
११. महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता ! / डॉ. अशोक मोटे | ५९
१२. गांधीजींचे तत्वज्ञान आणि ग्रामीण विकास / ईश्वर ल. राठोड | ६३
१३. महात्मा गांधीजींचे सत्याग्रह : एक नैतिक शस्त्र / मीरा वि. फड | ६९
१४. महात्मा गांधीजींची अपरिग्रह संकल्पना / डॉ. मोहन चौगुले | ७३
१५. महात्मा गांधीजींचे वैद्यकीय विचार / जयदेव उ. मोहिते | ७९
१६. अहिंसा : स्वरुप व सामर्थ्य / वितेश भारत निकते | ८४
१७. सत्याग्रही युगपुरुष : महात्मा गांधी / डॉ.तात्या बाळकिसन पुरी | ८७
१८. महात्मा गांधी और मानवीय मूल्य / डॉ. चित्रा धामणे | ९३
१९. महात्मा गांधीचे सत्य आणि अहिंसा तत्वः काळाची गरज / डॉ. जे.एस. ढवळे | ९७
२०. महात्मा गांधी के विचारां की प्रासंगिकता / चौधरी रेश्मा इस्माईल | १०१
२१. महात्मा गांधी और पर्यावरण / डॉ शेख रशिदा बेगम रहेमतुल्ला | १०४
२२. मूलोद्योगी शिक्षण योजना / श्री वृंदावन नि.नामवाडे | १०९
२३. महात्मा गांधीचे आर्थिक विचार / सुनीता तु.चव्हाण | ११३



Scanned with OKEN Scanner

12.

# गांधीजींचे तत्वज्ञान आणि ग्रामीण विकास

**प्रा. ईश्वर ल. राठोड**
समाजशास्त्र विभागप्रमुख,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :-** महात्मा गांधी हे स्वतंत्र्यपूर्व भारताच्या चळवळीतील महत्वपूर्ण योगदान देणारे नेते होते. गांधीजींनी ब्रिटिश व्यवस्थेला विरोध करुन स्वतंत्र भारताच्या निर्मितीसाठी सर्व चळवळीतील लोंकाना एकत्र करुन स्वतंत्र भारताच्या अस्तित्वाचा लढा उभारला. महात्मा गांधी हे भारत या राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देणारे एक महान समाजसुधारक ठरले. महात्मा गांधींनी अंहिसा, सविनय कायदेभंग, सत्तेचे विकेंद्रीकरण, सत्याग्रह, स्वराज्य अशा अनेक बाबींवर आपल्या कार्यातून परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य केले. गांधीजींनी आपल्या चळवळीतून समाज परिवर्तनाला महत्व दिले. त्यात विशेष म्हणजे 'खेडयाकडे चला'असा संदेश देवून ग्रामीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी त्याच्या कार्यातून प्रयत्न करण्यात आले. आज २१ व्या शतकात देखील गांधींजीचे तत्वज्ञान व ग्रामीण विकासाच्या बाबतीत गांधींजीचे कार्य महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

**अभ्यास विषयाचे महत्व :-** प्रस्तुत शोध निबंधात महात्मा गांधीच्या तत्वज्ञानाची गरज ही भारताच्या विकासासाठी महत्वाची आहे. कारण की, गांधीजी सर्व भारतीयांना संदेश देत असताना असे म्हणतात की, 'खेडयाकडे चला', याचा अर्थ असा आहे की, आज आपल्याला ग्रामीण विकासाची गरज आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव सर्व भारतीय समाज व्यवस्थेवर पडलेला असून आपण आपल्या ग्रामीण विकासाचे तत्वज्ञानापासून दूर जात असलेले दिसून येते. म्हणून या अभ्यासाच्या माध्यमातून गांधीजींचे तत्वज्ञान व ग्रामीण विकास कसे महत्वाचे आहे, यावर भाष्य करण्याचे प्रयत्न केले आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :-**

१. महात्मा गांधींजींच्या तत्वज्ञानाचे अभ्यास करणे.
२. महात्मा गांधींजींच्या सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.
३. महात्मा गांधींजींच्या ग्रामीण विकासाची संकल्पना समजून घेणे.
४. महात्मा गांधींजींच्या खेडयाकडे चला या संदेशांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :-**शोधनिबंध हा संशोधनाचा एक भाग असतो. ज्या प्रमाणे संशोधनातून संशोधक हा एखाद्या समस्येचे सुत्रण करतो आणि निष्कर्षाप्रत



Scanned with OKEN Scanner

पोहचतो. त्याचप्रमाणे शोध निबंधात देखील एखादी समस्या निश्चित करुन त्या समस्येची कारणमिमांसा केली जाते. कोणत्याही शोध निबंधासाठी तथ्यं फार महत्वाचे असतात. तथ्य संकलन हे दोन पध्दतीने केले जात असून प्राथमिक आणि दुय्यम हे तथ्यांचे प्रकार आहेत. या शोध निबंधासाठी दुय्यम साधनांचा वार केलेला आहे. त्याच प्रमाणे प्रस्तूत शोध निबंधासाठी वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्त्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, मासिके आणि वृत्तपत्रांचा वापर करण्यात आलेला आहे.

**गांधीजींचे तत्वज्ञान :-** महात्मा गांधीजींचे कार्य अथवा तत्वज्ञान अभ्यासले तर असे लक्षात येते की, गांधीजींनी आपल्या सामाजिक आणि राजकीय कार्यातून स्वातंत्र्यपूर्वकाळात आमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य केले. ब्रिटिश राजवटीत समग्र समाजाला एक दिशा देण्याचे कार्य गांधीजींनी केले. अंहिसा, असहकार, स्वराज्य, सत्याग्रह, सविनय कायदेभंग, सत्तेचे विकेंद्रीकरण अशा पध्दतीने गांधीजींनी समाजाला संघटित करुन संघर्षाच्या माध्यमातून समाज परिवर्तन आणि समाज विकासासाठी लढा उभारला, यातून गांधीजींच्या कार्याला यश प्राप्त होत गेले. परंतु या सर्व संघर्षात गांधीजी बरोबर काम करणारे अनेक नेते आणि जनसामान्यांना ब्रिटिशांचा फार मोठया प्रमाणात त्रास झाला. तरी देखील गांधीजींनी स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय लोकांना एकसंघ करुन स्वतंत्र्य भारताच्या निर्मितीसाठी यशस्वी लढा दिला.

ब्रिटिशांच्या राजवटीत स्वातंत्र्यपूर्वकाळात महात्मा गांधी हे एक थोर समाजसुधारक म्हणून उदयास आले. तत्कालीन भारतीय समाजात होणाऱ्या अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा, वाईट वृत्ती यांच्यावर लक्ष केंद्रित करुन त्यात कशाप्रकारे सुधारणा करता येईल यांचा अभ्यास केला. गांधीजींनी आपल्या राजकीय चळवळी बरोबरच त्यांनी सामाजिक सुधारणेचे देखील वृत्त हाती घेतले होते. असहकाराच्या व कायदेभंगाच्या चळवळीमधून समाजातील निरनिराळया थरांत त्यांनी जागृती घडवून आणली.

महात्मा गांधी यांनी सामाजिक परिवर्तन करीत असताना समाजातील विषमता कशा पध्दतीने निर्मूलन करता येईल, यासाठी आपल्या आयुष्यातील जास्त वेळ दिले. समाजामध्ये असलेली सांप्रदायिकता कशी कमी करता येईल, यासाठी प्रयत्न केले. अस्पृश्यता हा उच्चभ्रू लोक मोठया प्रमाणात पाळत होते. परंतु गांधीजींनी याला विरोध करुन अस्पृश्यता निवारण करण्यासाठी समाजामध्ये असलेली निकृष्ठ विचारधारा बदलून काढण्याचे प्रयत्न केले. अस्पृश्यांना गांधीजी हरिजन असे म्हटले.



Scanned with OKEN Scanner

गांधीजीं, स्वातंत्र्यपूर्वकाळातील ब्रिटिशांच्या शिक्षण पध्दतीला विरोध करत होते. कारण की, या शिक्षण पध्दतीत आपल्या भारतीय युवकांना भारताच्या संस्कृतीपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला गेला होता. गांधीजींनी सर्वसामान्य लोकांना शिक्षण घेता यावे, यासाठी अनेक प्रयत्न केले. स्त्रियांच्या विकासासाठी गांधीजींनी सामाजिक परिवर्तनाच्या माध्यमातून स्त्रियांचे सक्षमीकरण घडवून आणले.

म. गांधी नंतर गांधीजींचे विचार व कार्य या देशासाठी महत्वाचे ठरले. कारण गांधीजींच्या तत्वज्ञानाला जागतिक पातळीवर जसे महत्व आहे, तसेच प्रत्येक देश आणि त्या देशातील राजकीय व्यवस्था देखील गांधीजींच्या तत्वज्ञानाचा स्विकार करुन आपले राष्ट्र अबाधित ठेवण्याचे प्रयत्न करीत असतात. विषमतेविरुध्द लढणारे राष्ट्रध्यक्ष नेल्सन मंडेला यांनी आपल्या जीवनामध्ये गांधीजींच्या तत्वज्ञानावर ठाम राहून समाज परिवर्तन केले. म्हणजेच गांधीजीचे तत्वज्ञान हे भारतीय लोंकाना जसे महत्वाचे वाटतात. तसेच इतर अनेक देशात देखील गांधी विचारधारेचा स्विकार करुन एक आदर्श राष्ट्र निर्माण करण्याचे प्रयत्न आजही काही देश करीत आहेत. म्हणून असे म्हणता येईल की, गांधीजींचे विचार हे प्रत्येक मनुष्य जीवनासाठी महत्वाचे आहेत.

**ग्रामीण विकास आणि गांधीजींचे विचार :-** 'खेडयाकडे चला' असा विचार सर्व जनतेला देवून ग्राम विकासाला महत्व देणारे महात्मा म्हणजे गांधीजी होय. म. गांधीजीच्या मते, खेडयांची स्वयंपूर्णता झाली पाहिजे. यावर त्यांनी जास्त भर दिला. कारण की, देशाचा पोशिंदा म्हणजे शेतकरी, शेतकरी हा प्रामुख्याने खेडयामध्ये वास्तव्य करीत असतो. म्हणून गांधीजी असे प्रयत्न करतात की, खेडे समृध्द असतील तर देश विकसित होऊ शकतो. म्हणून गांधीजीनी खेडयाला महत्व दिले. खेडे स्वावलंबी बनविण्यासाठी खेडयातच सर्व उत्पादन व्हावे, त्यासाठी स्थानिक संसाधनाचा योग्य वापर व्हायला पाहिजे, ग्रामस्वराज्यासाठी गांधींजीनी सर्व लोकांना एका विचाराने विकसित करण्याचे प्रयत्न केले. गांधीजींच्या स्वप्नातील भारत हा खेडयांचा भारत होता. कारण त्या काळात सर्वाधिक प्रमाणात लोक ग्रामीण भागात राहत होते. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतात खेडयांची संख्या जास्त असल्याने खरा भारत हा खेडयांतच आहे, असे गांधीजींचे मत होते. परंतु आधुनिकीकरणामुळे जर भारतातील खेडी बुडाली तर भारत बुडेल असे त्यांना वाटत होते. म्हणून गांधीजींनी खादी ग्रामोद्योग, शेती व्यवसाय, दुग्धव्यवसाय इत्यादीवर भर दिला होता. भारतातील सर्व खेडी स्वयंपूर्ण असावीत असे गांधीजींचे स्वप्न होते. स्वप्नांना अस्तित्वात आणण्यासाठी गांधीजींनी स्वतः प्रयत्न करुन समाजात फार मोठया प्रमाणात बदल घडवून आणले.



Scanned with OKEN Scanner

कृषिप्रधान राष्ट्राची ओळख खऱ्या अर्थाने म. गांधीजींच्या कष्टाने झाली असे म्हणता येईल. कारण की, गांधीजींनी दिलेला मुलमंत्र हे ग्राम विकासाचे स्वप्न साकार करणारेच होते. भारताचा विकास म्हणजे खेडयांचा विकास हे सुत्र गांधीजींच्या ग्राम विकासाचे केंद्रबिंदू होते. महात्मा गांधीच्या ग्राम विकासामध्ये खेडयातील शेवटचा घटक हा स्वयंपूर्ण आणि सशक्त व्हावा हा त्यांचा उद्देश होता. याचाच एक भाग म्हणून गांधीजींनी स्वच्छतेचा मुलमंत्र दिला आणि भंग्याची कामे स्वतः केली कारण खेडे ही घाणीचे मोहेरघर आहे आणि घाणच रोगांना आमंत्रण देते. म्हणून म. गांधीनी गाव स्वच्छतेला आणि रोगांसबंधींच्या लोकांच्या डोक्यातील अंधश्रध्दा नष्ट करण्यावर विशेष भर दिला.

आजच्या चंगळवादी जागतिकीकरण आणि वैश्विकरणाच्या झंझावातात व स्पर्धेच्या युगात बहुराष्ट्रीय कंपन्या, विदेशी भांडवलशाही अर्थरचना स्थापन करणे किंवा स्थापन होऊ देणे याचा अर्थ आर्थिक गुलामगिरीला निमंत्रण देणेच ठरेल. अशा योजनेत, जी व्यवस्था उतरंडी सारखी असते. त्यात खालच्या मडक्यापर्यंत काहीच पोहचत नाही, तेथवर काहीच झिरपत नाही. कारण मधली जी व्यवस्थापकीय व आर्थिक अंमलबजावणीची रचना असते, तीच सारे काही गिळकृत करुन टाकते. महात्मा गांधींनी या देशाची जी अर्थरचना अगर सामाजिक रचना डोळयासमोर ठेवली होती. खेडे हे भारताचा चक्रबिंदू आहे असे ते मानीत आणि खेडयापासून सुरु होणाऱ्या लहान तरंगातून किंवा वलयातून मोठ-मोठी वलये निर्माण होतील, हा त्यांच्या अर्थव्यवस्थेचा व अर्थनीतीचा पाया होता. पंचायत राज्याचीही तीच भूमिका आहे. जनतेत स्वराज्यशक्ती निर्माण करण्याचे साधन आहे असे ते मानीत. म्हणून शेती व खादी, ग्रामोघोग मूलक ग्रामस्वराज्य त्यांना अभिप्रेत होते. 'कांते सो पहने, और पहने सो कांते' हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. जेणे करुन उत्पादक व उपभोक्ता यांच्या मधील दरी व दलाल संपून शरीरश्रम करणाऱ्या उत्पादकांची प्रतिष्ठा प्रस्थापित होईल. दलाल व आयतोबांची प्रतिष्ठा संपुष्टात येईल. महात्मा गांधींनी कोर्टातील त्यांच्या निवेदनात त्यांचा व्यवसाय 'शेतकरी व विणकर' असल्याचे सांगितले होते. पाश्मिात्य दार्शनिक खलिल जिब्रान याने म्हटले आहे की- जे लोक स्वतःच पिकविलेले अन्न खात नाहीत, त्यांची भूक कधीच शमत नाही. ते सदैव उपाशीच राहतात व ज्या देशातील लोक देशातच किंवा स्वतः विणलेले वस्त्र वापरीत नाहीत त्यांची नग्नता कधीच लपत नाही, अशा लोकांचे राष्ट्र सदैव अनुकंपनीयच असते. अशी अनुकंपनीय स्थिती आज भारताची आहे.

आज खेडे व शेतकरी यांच्याविरुध्द सुनियोजित कट किंवा षडयंत्र अस्तित्वात येत आहे. महागाई वाढली म्हणून प्रत्येक जण आरडाओरड करतो. आपापले महागाई भत्ते वाढवून घेतो आणि सर्व प्रस्थापित एकत्र येऊन मागणी



Scanned with OKEN Scanner

करतात की, धान्याचे भाव कमी करावेत. तेव्हा आपण विसरतो की, शेतकरी व खेडयातील अन्य नागरिकांना तर धान्याखेरीज अन्य सर्वच वस्तू वाढलेल्या भावाने विकत घ्याव्या लागतात. त्यामुळे आता फक्त निरक्षर शेतकरीच धान्य पेरतो व शहाणे शेतकरी ज्यात अधिक पैसा मिळू शकतो अशा वस्तूचेंच उत्पादन करतात. मग उत्पादन 'मकानासाठी' न राहता, 'दुकानासाठी व निर्यातीसाठी'च होते. ज्यास 'पैशाची पैदास' म्हणतात. डॉक्टर, वकील व इतर प्रतिष्ठीत व्यावसायिकांना त्यांच्या सेवेचे मूल्य ठरविता येते. शेतकऱ्याला मात्र त्याच्या उत्पादनाला किती पैसे लागलेत, हे ठरविता येत नाही. म्हणून त्याच्या धान्याचे अथवा उत्पादनाचे भाव काय असावेत हे मधले 'दलाल' किंवा शासन ठरविते. आज अशी अत्यंत वाईट परिस्थिती भारतातील शेतकऱ्यासमोर निर्माण झालेली आहे. म्हणून महात्मा गांधीच्या विचारांची गरज पुन्हा आजच्या भारताला असलेले दिसून येते. कारण गांधीजी 'खेडयाकडे चला' एवढेच म्हणून थांबले नाही तर स्वतः ग्रामीण विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करुन ग्राम स्वराज्य निर्माण करण्याचे स्वप्न पूर्ण केले. परंतु आजच्या समकालीन भारतात ग्रामीण विकासाची समस्या सार्वत्रिक स्वरुपात दिसून देते. आजही काही खेडी विकासाच्या केंद्रबिंदू पासून किती तरी दुर असल्याचे लक्षात येते, फक्त काही खेडयांचा विकास झाला म्हणजे संपूर्ण देशाचा विकास झाला असे नव्हे. म्हणून गांधीजींच्या विचाराला स्विकार करुन ग्राम विकासाची ध्येये साध्य करता येईल.

सर्वांगीण समतोल विकासात समृध्द लोकशाहीची बीजे रुजलेली असतात. सत्तेच्या विकेंद्रीकरणातून विकासाची धारा गावपातळीपर्यंत रुजवली गेली, खेडी स्वावलंबी, सक्षम झाली तरच महात्मा गांधीजींच्या 'ग्रामस्वराज्य'चे स्वप्न आणि 'खेउयाकडे चला' हा संदेश आपण प्रत्यक्षात आणू शकू. गावातील नैसर्गिक संसाधनांची उपलब्धता, त्यांचा उपयोग, त्यांचे संरक्षण, शासनाच्या विविध विभागांच्या विकास योजना, कृषी आणि कृषिपूरक उद्योगांचा विकास, रोजगाराच्या संधी व लोकांच्या सक्रिय सहभागातून ग्राम विकासाचा मार्ग अधिक सुकर आणि सुस्पष्ट होत जातो. गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या, तर ग्रामीण भागातून शहरांकडे धावणारे लोकांचे लोंढे आपण थांबवू शकू. याच विचाराने आणि ध्येयाने म. गांधींनी ग्रामीण विकासाची दिशा ठरविलेली दिसून येते. गांधीजींनी दिलेल्या विचार आणि कार्यानुसार आजही पुन्हा खेडे समृध्द होऊ शकतात.

डॉ. विजय भटकर असे म्हणतात की, शेती आर्थिकदृष्टया किफायतशीर बनवणे हाच भारताला समृध्द आणि वैभवशाली बनवण्याचा एकमेव मार्ग असल्याचा माझा ठाम विश्वास आहे. या आव्हानावर मात करण्याचे अनेक मार्ग



Scanned with OKEN Scanner

आहेत. कृषी धोरण, आर्थिक पाठबळ, शेतमालाला योग्य दर ठरवून देणे, अनुदाने, कृषी शिक्षण व संशोधन, तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर असे ते मार्ग आहेत. जर या पैलूंवर भारतात विशेष भर दिले तर भारत हा देश ग्रामीण विकासाच्या बाबतीत पुढारलेले राष्ट्र अथवा विकसित राष्ट्र म्हणून जागतिक स्तरावर पुढे येऊ शकते.

**निष्कर्ष** :- ग्रामीण विकासाची ध्येये साधण्यासाठी शासन, सरकार व शेती विषयी असलेली नकारात्मक भूमिका या विचाराला मुठमाती देवून नव समाजामध्ये खेडयातील जीवन पध्दतीला कसे समृध्द करता येईल. तसेच शेती क्षेत्रातील उत्पन्नातील सुधारणा करुन शेतकरी आर्थिकदृष्टया सक्षम बनविता येईल, याकडे लक्ष देणे फार गरजेचे आहे. तेव्हाच गांधीजीचे 'खेडयाकडे चला' या विचाराला महत्व प्राप्त होईल. म. गांधीजींचे तत्वज्ञान हे भारतासाठीच नव्हे तर सर्व जागतिक पातळीवर गांधीजींच्या कार्याचा आधार घेवून देशातील समाज व्यवस्था टिकवून ठेवण्याचे प्रयत्न केले. जाते. जागतिक स्तरावर गांधीजींचे विचार समाज परिवर्तन व ग्रामीण विकासासाठी महत्वपूर्ण ठरलेले आहेत. म्हणून गांधीजींच्या १५० व्या जयंतीच्या निमित्त त्यांच्या कार्याचा आदर्श घेत असतांना त्या पध्दतीने बदल होणे फार महत्वाचे आहे. तेव्हाच गांधीजींचे विचार आजही ग्रामीण समाजासाठी पुरक आहेत, असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ :-**


१. भिडे पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
२. संपादक- हंसा, (२००१), लौट आइए बापू, न्यु बूक सोसायटी ऑफ इंडिया, दिल्ली.
३. यार्दी अ. रा. (२०१३), बाळ गांधी, गांधीबापू झाले, त्याची गोष्ट, साहित्य अकादमी, दिल्ली.
४. शुक्ल चंद्रशेखर, (१९५०), गांधीजी के जीवन प्रसंग, दिल्ली प्रकाशन.
५. सुराना पन्नालाल, (२००४), गांधीजींची ओळख, सुगावा प्रकाशन, पुणे.
६. सं. वाडेकर अमित, (२०१२), खेडयाकडे परत चला, वनराई विशेषांक, पुणे.
७. Search – Google engine.


❑❑❑



Scanned with OKEN Scanner

Peer Reviewed Multi-Disciplinary
Annual National Indexed Research Journal
Published as per UGC (India) Guidelines

Impact Factor
5.455
www.sjifactor.com

ISSN 2349-9370
Vol. 7 Issue 3
Jan. 2020
Special Issue

# Research Journal of India

www.researchjournal.net.in www.indiramahavidyalaya.com www.mmcdarwha.org

**Special Issue**

**One Day Interdisciplinary National Conference on**

## Recent Trends and Issues in Humanities

**Organized by Mungasaji Maharaj Mahavidyalaya, Darwha**

**11 January 2020**

Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)
In collaboration with
Principal
MUNGASAJI MAHARAJ MAHAVIDYALAYA
DARWHA, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 202 (India)

Scanned with OKEN Scanner